(161)

# निमंत्रण

प्रकार स्थापनेसाठी ठेंबा घेणार नाही किंवा ही भूमिका घेतली आहे. साठी निमंत्रण दिले, तर भूमिकेवर ठाम राहण्यावर त नाही. तसे झाल्यास य म्हणून काँग्रेसलाही जाऊ शकते. (लोकमत






# पुणे क्लस्टरचे धोरण महिनाभरात

नागपूर : पुण्यातील क्लस्टर डेव्हलपमेंटबाबतचे नवे धोरण येत्या एक महिन्यात जाहीर केले जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी गुरुवारी विधानसभेत केली. एकेका इमारतीच्या पुनर्विकासासाठी असलेले प्रोत्साहन आहे तसेच कायम ठेवून क्लस्टरसाठी जादाचे प्रोत्साहन दिले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. मुंबईबाबतचे धोरण जाहीर केले की, पुण्यासाठी धोरण तयार करण्यावर भर दिला जाईल. लोकप्रतिनिधी, विकासकांची मते जाणून घेतली जातील, असे ते म्हणाले. (विशेष प्रतिनिधी)

### पिंपरी-चिंचवडचा निर्णय पुढील आठवड्यात

पिंपरी-चिंचवडमधील अनधिकृत बांधकामे ही डीपी रोडच्या जागेवर, नदीपात्रात किंवा अन्य कारणांसाठी आरक्षित जागांवर झालेली आहेत. त्यांच्याबाबत व्यवहारिक भूमिका घ्यावी लागेल. त्यासाठी आधी एमआरटीपी, लँड रेव्हेन्यू कोड, ग्रामपंचायत कायद्यांमध्ये काही बदल करावे लागतील. त्यांचा मसुदा तयार आहे. तो मंत्रिमंडळाच्या आगामी बैठकीत मान्यतेसाठी आणू.

# 'ल

## सोम

जयशंकर

ज्येष्ठ सम जनलोक केल्यानंत सरकार असलेल्य मंजुरीसाठ सरकारने करण्यावि केली आ राज्यसभेत मंजूर कर केंद्र सरका शुक्रवारीच ते मंजूर क

लोकमत 13.12.13

# कुमार विश्वास यांना धक्काबुक्की

## गैरव्यवहाराचे आरोप : राळेगणमधील प्रकार

विनोद गोळे : राळेगणसिद्धी

अण्णांच्या रामलीलावरील आंदोलनात गोळा झालेल्या निधीचा गैरवापर केल्याचा आरोप करीत इंडिया अगेन्स्ट करप्शनचा कार्यकर्ता म्हणवणाऱ्या नितीन चव्हाण याने आम आदमी पार्टीचे नेते कुमार विश्वास यांना धक्काबुक्की केल्याचा प्रकार गुरुवारी घडला. या प्रकारामुळे कार्यक्रमस्थळी गोंधळ उडाला. यानंतर विश्वास यांना बंदोबस्तात बाहेर पोहोचविण्यात आले.

अरविंद केजरीवाल यांनी तब्येतीच्या कारणाने राळेगण भेट रद्द केल्यानंतर त्यांच्या वतीने कुमार विश्वास, गोपाल राय, अंजली दमानिया, मयंक गांधी गुरुवारी दुपारी १ वाजेच्या सुमारास येथे दाखल झाले. अण्णांची भेट घेऊन त्यांनी त्यांच्याशी बंद खोलीत चर्चा केली. यानंतर विश्वास यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या वेळी त्यांनी 'काही विघ्नसंतोषी माणसे आमच्यात दुरावा निर्माण करीत आहे. गावकऱ्यांनीही सजग राहावे,' असे आवाहन केले. तसेच बारामतीमधून शरद पवार यांच्याविरोधात उमेदवार उभा करू, असे ते म्हणाले. ते बोलत

### सक्षम लोकपालच हवे

सक्षम नसलेले विधेयक मंजूर झाले तर ते स्वीकारणार नाही, असा पुनरुच्चार अण्णांनी केला. गुरुवारी त्यांनी पंतप्रधान कार्यालय राज्यमंत्री नारायणस्वामी, सोनिया गांधींसह भाजपचे अरुण जेटली यांना पत्र पाठवून भूमिका मांडली. या पत्रात सामान्य माणसाच्या भल्यासाठी हे विधेयक विनाविलंब मंजूर करा, असे आवाहन अण्णांनी केले आहे.

### केजरीवालांनी लोकपालावर बोलावे

केजरीवाल यांना आपला विरोध असण्याचे कारण नाही. मात्र, त्यांनी राजकारणावर भाष्य करू नये, एवढे पथ्य पाळावे, असे अण्णा म्हणाले.

असतानाच नितीन चव्हाण तेथे 'दलाल-दलाल' अशा घोषणा देत घुसला. या प्रकारानंतर विश्वास यांनी पत्रपरिषद आटोपती घेतली. ते उठून जात असताना चव्हाण याने विश्वास यांना धक्काबुक्की केली. कार्यकर्ते विश्वास यांच्या संरक्षणासाठी पुढे आले.

या वेळी 'आप'चे कार्यकर्ते आणि चव्हाण यांच्यात हमरीतुमरी झाली. यानंतर गर्दीतून वाट काढत विश्वास व सहकाऱ्यांनी राळेगण सोडले.

1732 2013
। गोवा येथून एकाच वेळी प्रकाशित ■ वर्ष : १५ अंक : ९०

(162)

स्थळ: द युनिक अॅकॅडमी, नवीन इमारत
जोशी वडेवालेच्यामागे, बालगंधर्व चौक, पुणे
बॅच सुरू 2 जानेवारी 2014
UNIQUE academy 020 - 25530950 9890192929
राज्यसेवा पूर्व परीक्षा टेस्ट सिरीज उपलब्ध

टीईटीचा यशोमार्ग

सराव प्रश्न / पान ४

चतुरंग
शनिवार, १४ डिसेंबर २०१३

स्त्रीस्वातंत्र्य आणि स्त्रीसाहित्य
ज्योती तिरपुडे

माध्यमातील स्त्री प्रतिमा
जबाबदार कोण?
मोहिनी मोडक

अंतरंग

## कोकण रेल्वेवर 'नाताळ' एक्स्प्रेस!

**मुंबई :** नाताळ आणि नववर्ष या निमित्ताने गोवा आणि कोकणात जाणाऱ्या प्रवाशांसाठी मध्य रेल्वे १५ डिसेंबरपासून कोकण रेल्वेमार्गावर शताब्दी एक्स्प्रेस चालविणार आहे. सोमवार आणि गुरुवार वगळता आठवड्याचे पाचही दिवस ती महिनाभर धावणार आहे. पान ८

## 'सवाई'चा सुरेल प्रारंभ

**पुणे :** पं. भीमसेन जोशी यांच्या स्वरातील सरस्वती वंदना... मधुकर धुमाळ यांच्या सनईतून दरवळणारा

लोकसत्ता 13.12.13

# अण्णांच्या आंदोलनाला 'आप'चा ताप!

## 'आम आदमी'च्या घुसखोरीमुळे नाराजी

विशेष प्रतिनिधी, पुणे

**सक्षम जनलोकपाल** विधेयकाच्या मागणीसाठी दोन दिवसांपासून राळेगणसिद्धी येथे उपोषणास बसलेले ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांच्या आंदोलनात गुरुवारी 'आम आदमी पक्षाने' शिरकाव केल्याने टीम अण्णामध्ये नाराजी पसरली आहे. लोकपाल विधेयक लोकसभा निवडणुकीपर्यंत मंजूर होऊ न देण्याचा 'आप'चा प्रयत्न असून ते अण्णांची चळवळ 'ताब्यात' घेऊ पहात आहेत, असा आरोप अण्णांचे समर्थक डॉ. विश्वंभर चौधरी यांनी केला; तर दुसरीकडे 'आप'चे नेते कुमार विश्वास यांना राळेगणमध्ये धक्काबुक्की करण्यात आल्याने टीम अण्णा आणि टीम केजरीवाल यांच्यातील दरी अधिकच रुंदावली आहे.



'आप'चे नेते अरविंद केजरीवाल यांनी गुरुवारी आपण अण्णा हजारे यांना भेटण्यासाठी जाणार असल्याचे बुधवारी म्हटले होते. मात्र, ऐनवेळी 'आजारी' असल्याचे कारण देत त्यांनी ही भेट रद्द केली. त्यांच्याऐवजी 'आप'चे नेते कुमार विश्वास व अन्य काही कार्यकर्ते राळेगण येथे दाखल झाले. मात्र, येथे त्यांचे स्वागत आम आदमी पक्षाविरोधातील घोषणांनी केले. त्यातच मुंबईहून आलेल्या नितीन चव्हाण या कार्यकर्त्याने विश्वास यांना धक्काबुक्की केली. ते पाहून विश्वास यांच्या कार्यकर्त्यांनीही त्याला धक्काबुक्की केली. पोलिसांनी हस्तक्षेप केल्याने पुढील प्रसंग टळला. मात्र, टीम अण्णा व टीम केजरीवाल यांच्यातला बेबनाव वाढल्याचे यातून स्पष्ट झाले.

उपोषण स्थळी आलेले कुमार विश्वास यांनी कोणतेही राजकीय विधान करू नये, असे त्यांना अण्णांनी बजावले होते. मात्र तरीही त्यांनी राजकीय वक्तव्य केले, असे विश्वंभर चौधरी म्हणाले. 'आप' अण्णांची चळवळ स्वतःच्या ताब्यात घेऊ पहात असल्याचा आरोपही त्यांनी केला. ते म्हणाले, 'सरकारकडून मांडल्या जाणाऱ्या लोकपाल विधेयकात अण्णांचे ७५ टक्के मुद्दे आहेत. आता निवडणुकीचे वारे असल्याने त्याकडे गांभीर्याने पाहिले जात आहे. त्यामुळे अण्णांनी हे विधेयक स्वीकारावे. उरलेल्या गोष्टींबाबत नंतर सुधारणा करता येतील, असे माझे मत आहे. मी, मेधा पाटकर आणि किरण बेदी यांनी अण्णांना तसे सुचवले आहे. मात्र, 'आप'कडून हे विधेयक न स्वीकारण्याबाबत अण्णांना सल्ला दिला जात आहे. विश्वास यांनी आपल्या भाषणात तसे सुचवले. 'आप'ला लोकसभेच्या निवडणुकीपर्यंत हा मुद्दा भिजत ठेवायचा आहे. कारण लोकपाल विधेयक मंजूर झाले तर त्यांच्याकडे मुद्दाच राहणार नाही,' असे चौधरी म्हणाले.

### विधेयक सोमवारी राज्यसभेत

लोकपाल विधेयक सोमवारी राज्यसभेत येईल असे संसदीय कामकाजमंत्री कमलनाथ यांनी सांगितले. त्यानंतर ते लोकसभेत आणले जाईल असे त्यांनी स्पष्ट केले. तर सरकार अधिवेशनाचा कालावधी कमी करून हे विधेयक रोखण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप विरोधी पक्षनेत्या सुषमा स्वराज यांनी केला. तातडीने हे विधेयक आणावे अशी भाजपची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, समाजवादी पक्षाने विधेयकाला विरोध केला आहे.

महागाईचा कळस

उद्योगक्षेत्राला मरगळ

व्याजदरवा